# योग दिन उत्साहात साजरा

विद्यापीठाच्या योगशास्त्र विभागाच्या वतीने आंतरराष्ट्रीय योग दिनानिमित्त घेण्यात आलेल्या योग प्रात्यक्षिकांना उत्स्फुर्त प्रतिसाद मिळाला. कुलगुरू प्रा. व्ही. एल. माहेश्वरी यांच्यासह विद्यापीठाचे अधिकारी, कर्मचारी, विद्यार्थी आणि एन.सी.सी.च्या विद्यार्थ्यांनी भाग घेतला.



२१ जून हा दिवस आंतरराष्ट्रीय योग दिवस म्हणून पाळला जातो. या वर्षी १० वा आंतरराष्ट्रीय योगदिन **"स्वतः साठी आणि समाजासाठी योग"** ह्या संकल्पनेसहीत साजरा करण्यात आला. याच अनुषंगाने कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठातील सर्व घटक विद्यार्थी, विद्यार्थिनी, शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी यांनी १० वा आंतरराष्ट्रीय योग दिवस उत्साहात साजरा केला. विद्यापीठाच्या पदवी प्रदान सभागृहात सकाळी ७ ते ८ या वेळेत प्रमुख पाहुण्यांच्या उपस्थितीत तसेच महाराष्ट्र १८ एन.सी.सी. बटालियन सेनेच्या विद्यार्थ्यांसह साजरा केला. आंतरराष्ट्रीय योगदिनाच्या कार्यक्रम प्रसंगी प्रमुख पाहुणे म्हणून कुलगुरू प्रा. व्ही. एल. माहेश्वरी, प्र- कुलगुरू प्रा.एस.टी. इंगळे, कुलसचिव डॉ. विनोद पाटील, राष्ट्रीय सेवा योजना संचालक डॉ. सचिन नांद्रे, क्रीडा संचालक डॉ. दिनेश पाटील, जिमखाना प्रमुख डॉ. के.एफ. पवार, १८ महाराष्ट्रीयन बटालियन राष्ट्रध्वज सेना मेजर सुभेदार प्रेमसिंग यांची प्रमुख उपस्थिती लाभली.



प्रास्ताविकात सहा.प्राध्यापक (योगथेरेपी) डॉ. लीना चौधरी यांनी विद्यापीठात सुरु असलेल्या विविध योग विषयक अभ्यासक्रमांची माहिती सांगितली. आंतरराष्ट्रीय योगदिनाचा प्रोटोकॉल सूक्ष्म व्यायाम, आसन, प्राणायाम, प्रात्यक्षिक अभ्यास प्रा. गीतांजली भंगाळे यांनी घेतला तसेच, माधवी तायडे यांनी योग प्रात्यक्षिक सादरीकरण केले. योगशास्त्र विभाग निर्मित पुस्तकाचे प्रकाशन कुलगुरुंच्या हस्ते करण्यात आले. त्याप्रसंगी बोलतांना कुलगुरू म्हणाले की, भारताला आणि जगाला योग व आयुर्वेद अशा दोन अमूल्य भेटी मिळालेल्या आहेत. यातील योगा मुळे , मस्तिष्क मन व शरीराचे संगोपन होते. आजच्या वाढत्या स्पर्धेच्या युगात वाढणाऱ्या ताण-तणाव, अपेक्षा यामुळे बिघडणाऱ्या मानसिक व शारीरिक स्वास्थ्यावर योग अत्यंत उपयुक्त आहे. त्यामुळे प्रत्येकाने म्हणजेच समाजातील प्रत्येक घटकाने योगाभ्यास करावा.

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन सुभाष पवार यांनी केले. योगशास्त्र विभाग प्रमुख इंजि.राजेश पाटील यांनी आभार मानले .या कार्यक्रमाच्या यशस्वितेसाठी यशवंत गरुड, हिम्मत जाधव, सुनील चव्हाण, वाल्मिक पाटील, सुरेश बागुल, तुषार सोनवणे, एकनाथ नन्नवरे, रत्नाकर सोनार, भिकन पाटील,भगवान साळुंखे यांनी सहकार्य केले.

# सायबर सुरक्षेबाबत शपथ

विद्यापीठात सायबर जागरुकता दिनानिमित्त शपथ घेण्यात आली व सायबर सुरक्षेबाबत मार्गदर्शन करण्यात आले. विद्यापीठातील संगणकशास्त्र प्रशाळा आणि क्वीक हेल फाऊंडेशन,पुणे यांच्यात सामंजस्य करार झाला असून त्याअंतर्गत विविध कार्यक्रम राबविण्यात येतात. विद्यापीठात सुरू असलेल्या रासेयो शिबीरात सायबर जागरुकता दिनानिमित्त विद्यार्थ्यांनी शपथ घेतली. संगणकशास्त्र प्रशाळेत अन्य सत्रात संचालक प्रा.एस.आर.कोल्हे यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. विद्यार्थ्यांची रिडल स्पर्धा, डिजिटल पोस्टर्स हे उपक्रम घेण्यात आले. शपथ घेतांना कुलगुरु प्रा.व्ही.एल.माहेश्वरी, प्र-कुलगुरू प्रा.एस.टी.इंगळे,कुलसचिव डॉ.विनोद पाटील, रासेयो संचालक प्रा.सचिन नांद्रे, प्रा.राजू आमले, पायस सावळे, मयुर बांडे, रेवती फिरके, प्रगती कोल्हे,दर्शन नेवे आदी उपस्थित होते.



